ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

# आसराबाई दराडे इंग्लिश मेडियम स्कूल एकलहरे, येथील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी शब्दसंग्रह वाढविण्यात येणाऱ्या अडचणिंचा शोध घेणे

डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी

*प्राचार्य,*

*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

**प्रस्तावना –**

२१ व्या शतकात ज्ञानाधिलिन समाजात ज्ञानाच्या कथा रुंदावलेल्या आहेत. ज्ञानाच्या जोरावर सर्वच क्षेत्रात झपाटयाने प्रगती झालेली आहे. किंवा प्रगती होत आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौध्दीक, भावनिक समतांच्या प्रगटीकरणासाठी व विकासासाठी शिक्षकांसाठी प्रयत्न करण्याची गरज असते. जे शिक्षक विद्यार्थी विकास डोळयासमोर ठेवून कार्य करतात व विद्यार्थी विकासासाठी विविध उपक्रम आखतात, ती शाळा व त्या शाळेतील विद्यार्थी खऱ्या अर्थाने विकसनशिल होतात.

आज माहीती तंत्रज्ञानाच्या युगात भाषेचे महत्व वाढत आहे. मराठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रथम भाषा म्हणून मराठीचे ज्ञान प्राप्तीसाठी त्या भाषेची कौशल्ये विद्यार्थ्यांना जाणीवपुर्वक शिक्षकांना शिकवावी लागतील. उत्तम भाषा अवलोकनासाठी भाषेतील शब्दसंग्रह समृध्द करणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांची मराठी भाषेतील अभिव्यक्ती संपादणूक स्तर उंचावण्यासाठी शब्दसंग्रह समृध्द करणे गरजेचे असते. म्हणूण विद्यार्थ्यांना मराठी शब्द संग्रह वाढविण्यात येणाऱ्या समस्यांशी संबंधित विषय प्रस्तुत संशोधनासाठी निवडला आहे.

मराठी विषयाच्या अध्यापनात विद्यार्थ्यांना लेखन व वाचन करावयास सांगितले जाते. विद्यार्थी लेखन व वाचन करतांना अनेक चुका करतात. त्यांना मराठी विषयातील बरेचसे शब्द आणि त्यांचे अर्थ माहीत नाहीत म्हणजेच त्यांच्याकडे मराठी शब्दांचा साठा कमी आहे असे दिसून येते त्यांचा मराठी विषयाचा शब्द संग्रह वाढविण्यासाठी सदर समस्येची निवड करण्यात आली.

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

**समस्या विधान :**

आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल (एकलहरे) येथील इंग्रजी माध्यमातील इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांना मराठी शब्दसंग्रह वाढविण्यात येणाऱ्या अडचणींच शोध घेणे.

**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :**

१) शाळा (स्कूल) : आसराबाई दराडे इंग्लिश मिडियम स्कुल (एकलहरे) येथील इंग्रजी माध्यम स्कूल.

२. विद्यार्थी : अध्यपन–अध्यापन प्रक्रियेत अध्ययन करणारा घटक

३. मराठी : महाराष्ट्राची मातृभाषा

४. इयत्ता ७ वी : महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या निकषांनुसार प्राथमिक स्तरावरील वर्ग

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

५. शब्दसंग्रह : मराठीतील शब्दांचा साठा.

**संशोधनाची परिकल्पना :**

मराठी शब्दसंग्रह वाढविण्यासाठी योग्य उपाय योजना राबविण्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञान संपादणूकीत लक्षणीय वाढ होते.

**शुन्य परिकल्पना :**

मराठी शब्दसंग्रह वाढविण्यासाठी योग्य उपाययोजना, राबविल्यानंतर ही विद्यार्थ्यांना ज्ञान संपादणूकीत लक्षणीय वाढ होत नाही.

**संशोधनाची तत्वे :**

१. स्वाश्रयी चले : विद्यार्थी

२. आश्रयी चले : मराठी शब्दसंग्रहाची वाढ

३. बाहय चले : शैक्षणिक वातावरण, शाळा

**उद्दिष्टे :**

१. इयत्ता विद्यार्थ्यांना मराठी विषयातील शब्दसंग्रह वाढविण्यात व समजण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे

२. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा मराठी भाषेतील शब्दसंग्रह वाढविण्यासाठी उपाययोजना राबविणे.

३. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील शब्दसंग्रह वाढविण्यास ही राबविलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये शब्दसंग्रह वाढविण्यासाठी घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती घेणे.

**महत्व :**

विद्यार्थ्यांची मातृभाषा व ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचे अनन्य साधारण महत्व आहे. बालपणापासुन मराठी भाषा वापरात असल्याने व इतर भाषांचे श्रेष्ठत्व अनेक माघ्यमातुन आपल्या मनावर बिंबविण्याने मराठी भाषेकडे बऱ्याचदा जाणते व अजाणतेपणाने दुर्लक्ष होतांना दिसते व हीच गोष्ट मराठी भाषेच्या ज्ञानापासून व शब्दार्थांच्या समृद्धतेपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवते.

**मर्यादा :**

१. सदर संशोधन हे मराठी विषयापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे मराठी विषयाच्या शब्दसंग्रह वाढविणे या घटकापुरतेच मार्यादित आहे.

**संशोधन कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला

१. पूर्वचाचणी : इ. ७ वी च्या विद्यााथ्यांसाठी मराठी विषयावर आधारित पूर्व चाचणी.

२. उत्तर चाचणी : इ. ७ वी च्या विद्यााथ्यांसाठी मराठी विषयावर आधारित उत्तर चाचणी.

**माहीती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी माीतीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या संशोधक निर्मिती साधनाचा वापर करण्यात आला आहे.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-III May - June 2021

**उपचारात्मक उपक्रम :**

१. विद्यार्थ्यांकडुन दररोज अनुस्वारयुक्त शब्द जोडशब्द साधेशब्द यांचे वाचन करुन घेतले व त्याचे लेखन वारंवार करुन घेतले.

२. विद्यार्थ्यांकडुन दररोज वेगवेगळी वाक्ये लिहिण्याचा व वाचण्याचा सराव करुन घेतला.

३. विद्याार्थ्यांना अपूर्ण चौकटीतील शब्दार्थ भरुन अर्थपुर्ण शब्द तयार करण्याचा सराव करुन घेतला.

४. विद्यार्थ्यांकडून दररोज पाठावरील परिच्छेदांचे वाचन करण्यास सांगितले.

५. विद्यार्थ्यांकडून दररोज वर्तमानपत्राचे वाचन करुन घेतले.

६. विद्यार्थ्यांना एक शब्द देवून त्यावरुन अर्थपूर्ण वाक्य लिहुन घेतले व वाचन करण्यास सांगितले.

७. विद्याार्थ्यांना विविध शब्दांचे अर्थ समजावून सांगितले.

**निष्कर्ष :**

१. विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या सवयीमध्ये सकारात्मक बदल दिसुन आले.

२. उपक्रमांच्या अंमलबजावणीनंतर अवांतर वाचन चांगले करता येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ५० टक्के वाढ झाली.

३. उपक्रमांच्या अंमलबजावणीनंतर अवांतर वाचनाची आवड नसण्णाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ३६ टक्के घट झाली.

४. प्राप्त माहितीवरुन असे दिसून येते की, ६२ टक्के पालक हे अशिक्षित असुन २२ टक्के पालकांचे फक्त प्राथमिक शिक्षण पूर्ण आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण असणारे पालक १२ टक्के असून ४ टक्के पालकांचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण आहे.

५. उपक्रमांच्या अंमलबजावणीनंतर ग्रंथालयाचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत अतिशय सकारात्मक अशी म्हणजे ५२ टक्के वाढ झाली.

**सूचना व शिफारशी :**

१. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथसंपदा वाढविण्यावर भर द्यावा.

२. शिक्षकांनी आकर्षक शैक्षणिक साहित्य निर्माण करुन त्यांचा वापर करावा

३. शिक्षकांमध्ये अवांतर वाचनाविषयी आवड निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी आयोजित केलेल योग्य त्या उपक्रमांना सहायता मिळावी.

४. विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून द्यावे.

५. रिक्त तासिकेला विद्यार्थ्यांना वर्ग वाचनालयाची पुस्तके पुरवावी.

**संदर्भ :**

१. मुळे रा. श. आणि मराठे वि. तु. ;१९७७द्ध शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

२. भिंतडे वि. रा. (१९९४द्ध शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नुतन प्रकाशन.

३. बापट भा. गो. (१९७५द्ध शैक्षणिक संशोधन, पुणे, नुतन प्रकाशन

४. बाळिंबे भो. रा. सुलभ मराठी व्याकरण पुणे, नुतन प्रकाशन